# उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा अर्ज

## माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी) परीक्षा

## फेब्रुवारी–मार्च / जुलै–ऑगस्ट २०

रु.१०/-

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| अर्ज नोंदणी क्रमांक | |
| प्रकरण क्रमांक | |

प्रति,

मा. विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

महोदय,

मी खालील सही करणार विनंती अर्ज करतो/करते की, मी फेब्रुवारी–मार्च/जुलै–ऑगस्ट २०-- च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी)/ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षेसाठी नमूद केलेल्या बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झालो होतो/झाले होते. सदर परीक्षेच्या माझ्या खालील विषयाच्या उत्तरपत्रिका/उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी मी प्रती विषय रु.३००/-(रु.तीनशे फक्त) व पुनर्मूल्यांकन अर्जाचे शुल्क रु.१०/- भरत आहे. माझा आवश्यक तपशील खालील प्रमाणे.

| परीक्षेचा बैठक क्रमांक | परीक्षार्थीचे नाव | शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

| पिनकोडसह पूर्ण पत्ता | | |
|---|---|---|
| | | |
| तालूका : | जिल्हा : | पिनकोड नंबर : |
| भ्रमणध्वनी (मोबाईल)क्रमांक : | | |

### उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा तपशील

| अ.क्र. | विषयाचे नाव | विषय कोड | उत्तराचे माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

सदर अर्जासोबत विषय शिक्षकांचा अभिप्राय, विषय शिक्षकांनी तपासणी केलेल्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती, संकेत स्थळावरील गुणांची /गुणपत्रिकेची व प्रवेशपत्राची प्रमाणित छायाप्रत इत्यादी कागदपत्रे जोडली आहेत.

| उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयची एकूण संख्या | भरलेले शुल्क प्रती विषय रु.३००/- प्रमाणे व अर्जाचे शुल्क रु.१०/- | भरलेल्या शुल्काचा तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | रोख रक्कम भरणा पावती क्रमांक | चलन क्रमांक | दिनांक |
| | | | | |

वर दिलेली माहिती खरी असून पुनर्मूल्यांकनासाठी मंडळाने निर्धारित केलेल्या अटी/शर्ती/सूचना मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

दिनांक :

ठिकाण :

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

## उच्च माध्यमिक (इ.१२वी )माध्यमिक शालांत (इ.१० वी )प्रमाणपत्र परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतच्या अटी व शर्ती

१) फक्त उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी करणारे विद्यार्थीच पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करु शकतील.

२) पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्याने स्वहस्ताक्षरात अर्ज करणे आवश्यक राहील.

३) यासाठी प्रती विषय रू. ३००/-(रू.तीनशे फक्त ) शुल्क मंडळाकडे रोखीने अथवा चलनाव्दारे जमा करावे लागेल.

४) पुनर्मूल्यांकनासाठी जास्तीत जास्त सहा विषयासाठी अर्ज करता येईल.

५) या विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळाल्यानंतर पाच दिवसाच्या आत मंडळाकडे विहीत नमुन्यात आपल्या शाळेतील/ क. महाविद्यालयातील विषय शिक्षकाकडून उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेवून त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज करणे आवश्यक राहील.

६) विद्यार्थी केवळ लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी मागणी करु शकतील. ऑनलाईनद्वारे दिलेली परीक्षा तसेच तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन व प्रकल्पलेखन किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही. तसेच विषयाच्या एका भागाचे उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.

७) जे विद्यार्थी इ.१०वी व इ.१२वी च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकेबाबत संपर्क केंद्रावरील/ आवेदनपत्र सादर केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून अभिप्राय घेवून अर्जासोबत सादर करावेत.

८) विद्यार्थ्यांना अर्जाचा नमुना मंडळाच्या संकेतस्थळावरुन सुध्दा उपलब्ध होवू शकेल. संकेतस्थावरुन प्राप्त करून घेण्यात येणाऱ्या अर्जाचे शुल्क( रु.१०/-) संबंधित विद्यार्थ्यास पुनर्मूल्यांकनाच्या शुल्कासोबत मंडळाकडे जमा करावे लागेल.

९) परिपूर्ण भरलेला अर्ज विद्यार्थ्यास किंवा त्याच्या प्रतिनिधीमार्फत मंडळाकडे समक्ष हस्तपोच स. १०.३० ते दु. ३.०० या वेळेत सादर करावेत. कोणत्याही परिस्थितीत पोष्टाव्दारे प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. पुनर्मूल्यांकनाचे शुल्क रोख अथवा चलनाव्दारेच स्विकारले जाईल.

१०) उत्तरपत्रिकेची पुनर्मूल्यांकनाची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात येईल.

(अ)वस्तुनिष्ठ प्रश्न (१ किंवा अर्ध्या गुणांचे प्रश्न . उदा :- रिकाम्या जागा, जोड्या लावा, योग्य पर्याय निवडा, चुक किंवा बरोबर लिहा इ. प्रकारचे प्रश्न) पुर्णपणे तपासले जावून त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राह्य धरण्यात येईल.

(ब)इतर सर्व प्रश्न गुणात बदल होणाऱ्या उत्तराबाबतचा निर्णय समितीच्या बहुमताने मान्य होणे आवश्यक आहे. समान संख्येच्या मतांच्या बाबतीत मुख्य नियामक/ समिती प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहील. त्यामधील वाढ/घट ग्राह्य धरण्यात येवून असे बदल विहित पध्दतीने विभागीय अध्यक्षांच्या मान्यतेने सदर निर्णय अंमलात आणले जातील.

(क)या प्रमाणे संपूर्ण उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यास प्राप्त झालेले सुधारीत गुण हे त्याने त्या विषयात अशा प्रश्नांसाठी पूर्वी मिळविलेल्या गुणाच्या (मूळ गुणांच्या)किमान ५ टक्के कमी किंवा जास्त असतील तरच सुधारित गुण ग्राह्य धरण्यात येतील. अन्यथा निकालात कोणताही बदल न करता विद्यार्थ्यास 'नो चेंज' कविण्यात येईल.

११) पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्याच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधित विद्यार्थ्यास व शाळा / क. महाविद्यालयास कळविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्याने आपले मूळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा करावे. त्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रक विभागीय मंडळाकडून विनामूल्य देण्यात येईल.

१२) गुणात बदल झालेल्या प्रकरणाबाबत फक्त पुनर्मूल्यांकनसाठी आकारलेले शुल्क परत दिले जाईल.

१३) उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन केल्यानंतर त्यावर होणारा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. त्यानुसार पुनर्मूल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्याची मूळ संपादणूक आपोआप रद्द होवून सुधारित संपादणूक विद्यार्थ्यास स्विकारावी लागेल. प्राप्त झालेले गुण हे त्याने मिळविलेल्या गुणांच्या (मूळ गुणांच्या )५ टक्के पेक्षा कमी होत असतील तरच ते कमी करण्यात येतील.

१४) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मूल्यांकनानंतर त्याच्या मूळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास ५ टक्के पर्यंतचा गुण बदल प्रकरणी त्याचा मूळ निकाल कायम ठेवण्यात येवून त्यास 'नो चेंज' असे कळविले जाईल.

१५) एकदा उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन केल्यानंतर त्याच उत्तरपत्रिकाच्या पुन:श्च गुणपडताळणी, पुनर्मूल्यांकन किंवा छायांकित प्रतींची मागणी करता येणार नाही.

१६) पुनर्मूल्यांकन संदर्भातील तक्रार निवारण पध्दती ही निकालात सुधार होण्यासाठी विद्यार्थ्यास उपलब्ध करुन देण्यात आलेली अतिरिक्त सुविधा असल्यामुळे यानुसार कार्यवाही करीत असताना निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्यास त्यामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामास/ शैक्षणिक नुकसानीस मंडळ जबाबदार असणार नाही.

१७) पुनर्मूल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत विद्यार्थ्यास दिली जाणार नाही किंवा माहिती अधिकारातही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही.

१८) दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यालाही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी व पुनर्मूल्यांकनासाठी विहित शुल्क भरावे लागेल.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

## कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर

### उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकनाबाबतचा अभिप्राय

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी)/उच्च माध्यमिक (इ.१२वी)प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च/जुलै-ऑगस्ट २०

विषय - दिनांक - / /२०१९

मी (शिक्षकाचे पूर्ण नाव ) --------------------------------------
------------------------------------- ------------------ या शाळेत
/कनिष्ठ महाविद्यालयात-----------------------या पदावर कार्यरत असून इ. १० वी /इ. १२ वी ला
---------हा विषय शिकवित आहे.

अर्जदार विद्यार्थी हा आमच्या शाळेतील/क.महाविद्यालयातील असून तो उच्च माध्यमिक/माध्यमिक शालांत प्रमाणपत्र फेब्रु-मार्च/ जुलै-ऑगस्ट -२०१९ परीक्षेस प्रविष्ठ झाला होता. सदर विद्यार्थ्याने मंडळाकडून उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत घेतल्यानंतर पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा अर्ज केलेला आहे. त्यानुसार सदर विद्यार्थ्याचे उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीची मी नमुना उत्तरांच्या आधारे पुनश्च: तपासणी केलेली असून मला खालील प्रश्नात कमी गुणदान झाल्याचे आढळून येते./गुणदान योग्य झाल्याचे आढळून येते. गुणदान कमी झाल्याबाबत मी खालीलप्रमाणे सकारण अभिप्राय देत आहे. (अभिप्राय देताना प्रश्न क्रमांक , उपप्रश्न क्रमांक स्पष्टपणे नमूद करावे.)

-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------

विषय शिक्षकाची स्वाक्षरी

मुख्याध्यापक/प्राचार्य स्वाक्षरी
शाळा/ क.महाविद्यालयाचा शिक्का

**कार्यालयीन उपयोगासाठी**

विद्यार्थ्याचे पूर्ण नांव ----------------------------

बैठक क्रमांक -

पुनर्मुल्यांकनासाठीचा विषय -